**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक २८ जून २०२५**

**ठळक बातम्या**

1. संविधान उद्देशिका पार्क आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे लोकार्पण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मरणासाठी संविधान उद्देशिका पार्क एक महत्वाचे पाऊल - सरन्यायाधीश भूषण गवई यांचे नागपुरात प्रतिपादन
2. संविधानाच्या उद्देशिकेतील मुल्यांचा अंगीकार व्हावा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन तर संविधान उद्देशिका पार्कद्वारे संविधानातील मौलिक विचार जनतेपर्यंत पोहचतील - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा विश्वास
3. महास्ट्राइड प्रकल्पांतर्गत सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक आज नागपुरात
4. जागतिक एथलेटिक्सच्या क्रमवारीत भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्राला पुन्हा एकदा अव्वल स्थान.

-----------------------------------------------

**संविधान उद्देशिका पार्क**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जागतिक मूल्य आणि भारतीय शाश्वत मूल्य यांची उत्तम सांगड घालत भारतीय संविधानाची निर्मिती केली असून उद्देशिका हा संविधानाचा गाभा आहे. उद्देशिकेतील मुल्यांचा अंगीकार देशातील नागरिकांनी करावा. त्यामुळ देशातील ९० टक्के प्रश्न कायमचे सुटतील, अस प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कुल ऑफ लॉच्या परिसरात संविधान उद्देशिका पार्क आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच लोकार्पण भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, विधी आणि न्याय राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, सामाजिक न्याय विभागाचे प्रमुख सचिव हर्षदीप कांबळे, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, माजी मंत्री नितीन राऊत यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले कि,

*(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ४४ सेकंद )*

*ज्या महाविद्यालयामध्ये भारतीय संविधानाचे धडे आम्हाला मिळाले संवैधानिक मूल्य.आमच्या कृतीमध्ये ज्या महाविद्यालयामुळे रुजले त्याच महाविद्यालयामध्ये अतिशय सुंदर अशा प्रकारचा हा संविधान प्रस्ताविका पार किंवा संविधान उद्देशिका पार्क या ठिकाणी तयार झाला. अतिशय सुंदर अशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मूर्ती ही देखील याठिकाणी तयार झाली आणि आज त्याच्या उद्घाटनाकरता माननीय सरन्यायाधीश महोदय या ठिकाणी उपस्थित आहे. त्यामुळे आपल्या विधी, महाविद्यालयाचा आणि विशेषता म्हणजे हि जे काही गिरीश भाऊंच्या अध्यक्षतेखाली समिती तयार झाली होती.या समितीचे मनापासून अभिनंदन करतो आणि आभार मानतो.*

संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात या पार्कची कार्यपूर्ती होवून जनतेसाठी खुला होत आहे ही त्यातही महत्वाची बाब आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाची नवीन इमारत बांधण्यात येईल तसच संविधान उद्देशिका पार्कला आवश्यक सर्व सोयी सुविधा पुरविण्यात येईल, असही त्यांनी सांगितल.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर शहरातच आपल्या आयुष्याच्या अंतिम काळात क्रांतीकारक धम्मप्रवर्तन केले. या क्रांतीकारक घटनेचे स्मरण कायम राहण्यासाठी आणि यातून प्रेरणा घेण्यासाठी दीक्षाभूमी स्मारकाची स्थापना झाली.

ते म्हणाले कि.......

*(होल्ड बाईट भूषण गवई - २२ सेकंद )*

*तो नागपूरचा मध्यबिंदू आहे तो झीरो पॉइंट आहे. भारताच्या दक्षिण आणि उत्तर दिशा भारताच्या पूर्व आणि पश्चिम दिशा ज्या ठिकाणी मिळतात त्या मध्यबिंदूला सर्वप्रथम संविधान चौक म्हणून नागपुरला तो मान दिलेला आहे हे संविधान आपल्या सर्वांच्या हृदयात आहे हे भारताच्या मध्यस्थानी संविधान चौकाच्या निमित्त आपण अधोरेखित केलेला आहे.*

संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात भारताचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्विकारण्याचा आणि त्यानंतर पहिल्याच नागपूर भेटीत संविधान उद्देशिका पार्कच्या उद्घाटनाचा योग आल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या पार्कमध्ये लावण्यात आलेली भित्तीचित्रे, बाबासाहेबांचे मौलीक वाक्ये आदी बाबी उल्लेखनीय असल्याचेही त्यांनी सांगितले.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठान संविधान उद्देशिका पार्क उभारण्यासाठी पुढाकार घेतला आणि राज्य शासनाच्या अर्थ सहाय्यान आणि लोकसहभागातून ही उत्तम संकल्पना प्रत्यक्षात आली. या पार्कच्या माध्यमातून संविधानातील मौलिक विचार या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह समस्त जनतेपर्यंत पोहचतील याचा महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी

**म्हणून सार्थ अभिमान आणि समाधान असल्याच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आपल्या भाषणात संविधान उद्देशिका पार्कच्या उभारणीसाठी सामाजिक न्याय मंत्रालयाच्या वतीन करण्यात आलेल्या अर्थ सहाय्यासहीत अन्यबाबींचा परामर्श घेतला. तत्पूर्वी सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला.संविधान उद्देशिका पार्कच्या मध्यभागी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान हातात धरलेली प्रतिमा स्थापित करण्यात आली आहे. उद्देशिका पार्कमध्ये संविधान उद्देशिकेतील भारतीय संविधान, आम्ही लोक, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, प्रजासत्ताक, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता आदी दहा मूल्यांचे भितिचित्रे (म्युरल्स) लावण्यात आली आहेत. उद्देशिका पार्कमध्ये लोकशाहीचे मुख्य आधारस्तंभ असलेले राष्ट्रपती भवन, संसद भवन, सर्वोच्च न्यायालय यांच्या प्रतिकृती आणि अशोक स्तंभदेखील तयार करण्यात आला आहे. संपूर्ण संविधान प्रास्ताविका पार्क हा दोन एकर परिसरात साडेनऊ कोटी रुपये खर्चातून निर्माण करण्यात आला आहे. या पार्कमध्ये प्रवेश करण्यासाठी एक भव्य प्रवेशद्वार देखील उभारण्यात आले आहे.**

**-----------------------------------------------**

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी**

**तरुणांना भारतीय परंपरांशी जोडण्यात महान जैन ऋषींच मोलाचं योगदान आहे, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं आचार्य विद्यानंद जी महाराजांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमाचं उद्घाटन केल्यानंतर व्यक्त केलं. या प्रसंगी त्यांनी जैन मुनींच्या हस्त लिखीतांचं डीजीटायजेशन करण्याबद्दल माहिती दिली..........**

***(होल्ड बाईट - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी- हस्तलिखीत लिपी- ३० सेकंद )***

***हम भारत की प्राचीन पांडुलिपियों को डिजिटाइज करने का अभियान भी चला रहे हैं। इसमें बहुत बड़ी मात्रा में जैन धर्म ग्रंथों और आचार्यों से जुड़ी पांडुलिपियां शामिल हैं। अब हम हायर एजुकेशन में भी मातृभाषा को बढ़ावा देते हैं।विकास और विरासत को एक साथ लेकर आगे बढ़ना है। इसी संकल्प को केंद्र में रखकर हम भारत के सांस्कृतिक स्थलों का तीर्थ स्थानों का भी विकास कर रहे हैं।***

**या वेळी पंतप्रधानांनी आचार्याजींना आदरांजली अर्पण करण्यासाठी प्रत्येक भारतीयांनी अवलंब करावा, अशा 9 संकल्पांविषयी आपलं मत व्यक्त केलं. यात ते म्हणाले की, प्रत्येक भारतीयांनी पाणी वाचवण्यासाठी कटीबद्ध असायला हवं. नैसर्गिक शेती, सुदृढ जीवनशैली, नियमित योग, व्यायाम, जेवणात श्रीअन्नाला**

प्राधान्य, गरिबांना मदत हीच आचार्यांना खरी आदरांजली असेल, असही प्रधानमंत्री म्हणाले

-----------------------------------------------

महास्ट्राइड

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी महास्ट्राइड या महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या अग्रेसर बनवणाऱ्या प्रकल्पांतर्गत सर्व जिल्हाधिकाऱ्यांच्या दोन दिवसीय परिषदेचं उद्घाटन आज नागपूर इथं होत आहे. भारतीय व्यवस्थापन संस्था-आय.आय.एम. इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज सायंकाळी होत आहे.भारताला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र करण्याच्या केंद्र सरकारच्या संकल्पात राज्याची अर्थव्यवस्था साडेतीन ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचं ध्येय निश्चित केलं आहे.

-----------------------------------------------

नीरज चोप्रा

जागतिक एथलेटिक्सच्या क्रमवारीत भारताचा भालाफेकपटू नीरज चोप्रान पुन्हा एकदा अव्वल स्थान मिळवलं आहे. त्यान ग्रेनेडाच्या एंडरसन पिटर्स ला मागे टाकत दुसऱ्यांदा प्रथम स्थान पटकावलं आहे. गेल्या वर्षी १७ सप्टेंबर ला डायमंड लीग अतिम सामना जिंकल्यानंतर पिटर्स पहिल्या स्थानावर आला होता. निरजच्या सातत्यपूर्ण यशानंतर तो पुन्हा पहिल्या स्थानी आला आहे. पीटर्स दुसऱ्या, तर जर्मनीचा जूलियन वेबर तिसऱ्या तर, पाकिस्तानचा यंदाचा ऑलिंपिक सुवर्ण पदक विजेता अर्शद नदीम चौथ्या स्थानावर आहे.

-----------------------------------------------

नक्षल अटक

भूसुरुंग स्फोट, चकमकी आणि दोन नागरिकांच्या हत्येत सहभागी राहिलेल्या कोरची दलमच्या उपकमांडरला गडचिरोली पोलिसांनी भामरागड तालुक्यातील कवंडे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जंगलातून काल रात्री अटक केली. अंकल उर्फ मन्नू सुलगे पल्लो अस अटक केलेल्या नक्षल्याचे नाव आहे. त्याच्यावर राज्य शासनान ६ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

-----------------------------------------------

भंगार केंद्र

राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटी सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावर राज्यातील सर्वात मोठे भंगार केंद्र उभारणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी महामंडळाच्या आढावा बैठकीत ही माहिती दिली. या केंद्रात जुन्या

**वाहनांची शास्त्रीय पद्धतीन विल्हेवाट लावण्यात येणार असून त्याद्वारे काही सुटे भाग पुन्हा वापरता येतील असंही ते म्हणाले.**

**------------------------------------------------**